# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय रामनगर सृष्टी,
मिरारोड पुर्व, जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-१००    दिनांक - १९/०३/२०२४

## व्यापारांचा विश्वास संपादन करुन व्यापारांकडुन स्टेशनरीचा मालाची ऑर्डर देऊन खरेदी केलेल्या मालाचे पैसे न देता आर्थिक फसवणुक करणाऱ्या २ आरोपींना अटक करुन ६ लाख २८ हजार ७७० रुपये किंमतीचा मुददेमाल हस्तगत करण्यात वालीव गुन्हे प्रकटीकरण शाखेला यश

फिर्यादी नामे अब्दुल्ला मोहम्मद युसुफ शेख यांची ब्राईट फायलिंग सोलुशन मॅन्युफॉक्चरींग नामक कार्यालयीन स्टेयानरी उत्पादन करण्यारी कंपनी आहे. फिर्यादीचे नमुद कंपनीस आरोपीतांनी बॉक्स फाईलची ऑर्डर देऊन फिर्यादीकडुन दिनांक- २२.०२.२०२४ रोजी व दिनांक- २४/०२/२०२४ रोजी असे दोन टप्प्यात एकुण १८६८ बॉक्स फाईल व ३०० स्प्रीग फाईल असा एकुण १ लाख ४८ हजार ७७०/- रुपये किंमतीचा स्टेशनरी माल खरेदी केला. परंतु फिर्यादीस आरोपीतांनी पुढील तारखेच्या धनादेशाद्वारे मालाची रक्कम देण्याचे आश्वासीत करुन फिर्यादीस न वटणारे परंतु पुढील तारखेचे धनादेश दिले. त्यापोटी फिर्यादीने आरोपीतांवर विश्वास ठेवुन आरोपीतांना एकुण १८६८ बॉक्स फाईल व ३०० स्प्रीग फाईल असा एकुण १ लाख ४८ हजार ७७०/- रुपये किंमतीचा स्टेशनरी मालाचा पुरवठा केला. तथापि, आरोपीतांनी खरेदी केलेल्या मालाचे पैसे न देता माल स्विकारुन फिर्यादीची आर्थिक फसवणुक केली. त्याअनुषंगाने फिर्यादी अब्दुल्ला मोहम्मद युसुफ शेख यांनी दिलेल्या तक्रारीवरुन वालीव पोलीस ठाणे गु.र.क्र. १४९/२०२४ कलम ४२० भा.दं.वि.अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला.

सदर गुन्हयाचे तपासादरम्यान तांत्रीक विश्लेषणाचे आधारे आरोपीताची माहीती काढुन भाईदर व मिरारोड परीसरातुन शोध घेतला. प्रस्तुत अपराध प्रकरणाच्या अनुषंगाने प्राप्त माहिती व निष्पादीत तथ्यांचे आधारे आरोपीत नामे १) राजन ऊर्फ मनोज रामलाल सोनार वय- ४३ वर्ष, व्यवसाय- स्टेशनरी व्यवसाय सप्लाय, रा. मेरी गोल्ड अपार्टमेंट, रुम नं- अे/३२ सेलीब्रिटी हॉटेलजवळ, एव्हरशाईन गेटजवळ,वसई पुर्व ता.वसई जि.पालघर आणि २) तेजस सतीश पाटील वय- ३१ वर्ष, व्यवसाय- स्टेशनरी सप्लाय व्यवसाय, रा. रुम नं- ५०६, विजेंद्र अपार्टमेंट, क्रॉस गार्डन भाईदर पश्चिम जि.ठाणे यांना ताब्यात घेण्यात आले. उभय आरोपीतांकडे केलेल्या तपासात आरोपीतांनी फसवणुक केलेल्या मालापैकी अंशतः माल हा जि.अहमदाबाद राज्य- गुजरात येथील इसम नामे शांतीलाल जैन यास विक्री केल्याची बाब उघड झाली. सबब, गुजरात राज्यातील अहमदाबाद येथे पोलीस पथक पाठवुन गुन्हयातील आरोपीत शांतीलाल जैन यांचेकडुन गुन्हातील स्टेशनरी साहीत्यामध्ये लागणारे सेलो टेप, बॉक्स फाईल व स्प्रींग फाईल असा **एकुण ६ लाख २८ हजार ७७० रुपये किंमतीचा मुददेमाल** हस्तगत करण्यात आला आहे. आरोपीतांकडुन दोन गुन्हाची यशस्वी उकल करण्यात वालीव पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटिकरण शाखेस यश आले आहे. त्याचा तपशिल खालीप्रमाणे :-

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.क्र. |
|---|---|---|
| १ | वालीव | गु.र.क्र.१४९/२०२४ कलम ४२०, ४०६, ४११, ३४ भा.दं.वि. |
| २ | वालीव | गु.र.क्र. १५०/२०२४ कलम ४२०, ३४ भा.दं.वि. |

वरील कामगीरी श्रीमती पौर्णीमा चौघुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ- २ वसई, श्री. उमेश माने-पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग, वालीव पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जयराज रणवरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. जिलानी सय्यद यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटिकरण शाखेचे स.पो.नि. सचिन सानप, पो.हवा/ मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, सतीश गांगुर्डे, बाळु कुटे, पो.अं/ विनायक राऊत, अभिजीत गढरी यांनी यशस्वीरित्या कामगीरी पार पाडली आहे.

